करोना २०२०/सूचनां/आदेश क्र. १४४


महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग
दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१
Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com


---

क्र.साशा/कार्या-1/ब-5/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/2020 दि. २८/03/2020

**महत्वाचे**

वाचले:- 1) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-2005

2) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचनां क्र.करोना 2020/ प्र.क्र.58/आरोग्य 5 दि.13/03/2020

3) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, 1897 ची नियमावली दि.14/03/2020

4) साथ रोग अधिनियम 1897

5) मा.जिल्हाधिकारी यांचेकडील करोना 2020/सूचना/आदेश/क्र. 101, क्र.साशा/कार्या-1/ब-5/करोना विषाणू/प्रति.उपाय/2020 दि. 24/03/2020

**आदेश**

आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

राज्य शासनाने कोरोना विषाणू (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13/03/2020 पासून लागू करुन सदर कायद्यामधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित करण्यात आलेली आहे. त्या अनुंषगाने करोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून संदर्भीय आदेश क्र. 5 अन्वये जिल्हयामध्ये वाहतूक बंदी लागू करण्यात आलेली आहे. परंतु सदर आदेशान्वये डेअरी/ पोल्ट्री आणि शेतीपूरक उद्योग या बाबी संदर्भातील वाहतूकीस परवानगी देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सदर डेअरी/ पोल्ट्री आणि शेतीपूरक उद्योग बाबी संदर्भात वाहतूक करणा-या वाहनांस पासेस देण्याची आवश्यकता आहे.

तरी सदर पासेस निर्गमित करणेकामी **जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त रायगड** यांची या आदेशाद्वारे नेमणुक करण्यात येत आहे. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त रायगड यांनी डेअरी/ पोल्ट्री आणि शेतीपूरक उद्योग संबधीत वाहतूक करणा-या वाहनांना आपले स्तरावरुन आवश्यक पासेस निर्गमित करावेत व त्याबाबत नोंदवही ठेवावी. तसेच त्या सेवेच्या उद्योजकांना स्वच्छतेबाबत व काम करताना ठराविक अंतर (Social Distancing) व आवश्यक ती दक्षता घेणेबाबत मार्गदर्शन करावे.

वरील आदेशानुसार संबंधितांनी तात्काळ कार्यवाही करावी. या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यास संबंधितांविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अंतर्गत व रोग प्रतिबंध कायदा १८९७ मधील कलमांतर्गत तसेच भारतीय दंड संहिता १९६० चे कलम १८८ अंतर्गत कारवाई केली जाईल. याची गंभीर नोंद घ्यावी.

सदरच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करुन पुर्तता अहवाल या कार्यालयाकडे वेळोवेळी सादर करणेत यावा.

जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग Collector Raigad-Alibag

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

प्रति : - जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त रायगड
प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
१) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई
२) पोलीस अधिक्षक रायगड अलिबाग
३) पोलीस उपायुक्त पनवेल, परिमंडळ - २.
४) उपविभागीय अधिकारी सर्व
५) तहसिलदार सर्व

जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग Collector Raigad-Alibag

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग